# जिल्हा निवड समिती नाशिक

## जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत पदभरती २०११

**जाहिरात क्रमांक ०१/२०११** **नाशिक दि. /०९/२०११**

१) जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत गट "क" व गट "ड" चे खालील परिच्छेद ३ मध्ये नमुद सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. (परिच्छेद ३ मधील अनुक्रमांक १ ते १० कडील पदे गट क मधील आहेत तर अनुक्रमांक ११ कडील पद गट ड मधील आहे.) पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणांचे तपशिल देखील परिच्छेद ३ मधील विवरणपत्रात नमुद केले प्रमाणे आहेत. गट क मधील पदांसाठी उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समिती मार्फत केली जाईल. तर गट ड मधील पदांसाठी उमेदवारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा परिषद गट ड निवड समिती मार्फत केली जाईल.

२) इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **http://www.zpnashikgov.in** तसेच **www.BrainAge.in** या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन **पोष्ट बॅग नं.२,व्दारा सब पोष्ट मास्तर ऑफिस, शिवाजीनगर, पूणे ४११ ००५** या पत्यावर पोष्टाने पाठवावे. परिच्छेद ७ अ) मधील विवरणपत्रात पदनिहाय लेखी परिक्षेचा दिनांक व वेळापत्रक, अर्ज स्विकृती कालावधी, अपात्र अर्जाची यादी घोषित करणेचा दिनांक व लेखी परिक्षेकामी प्रवेशपत्र वितरीत करणेचा कालावधी इ. माहिती अंतर्भुत केलेली आहे. ज्या उमेदवारांनी सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र नाशिक, सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र विदयापीठ पुणे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प नाशिक / कळवण व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नाशिक इ. कार्यालयात रोजगारासाठी नावे नोंदणी केली असेल त्यांनी देखील ते इच्छुक व पात्र असल्यास विहीत शुल्क भरुन विहित नमुन्यात या पदांसाठी अर्ज करणे आवश्यक राहील. बंधपत्रित आरोग्य सेवक (महिला) उमेदवारांनी देखील या जाहिरातीस अनुसरुन विहित शुल्क भरुन विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहिल.

**३)सरळ सेवा भरतीने भरणेसाठी घोषित पदे**

| अ. क्र | सामाजिक प्रवर्ग | भरावयाची एकुण पदे | महिला | माजी सैनिक | खेळाडू | भुकंप ग्रस्त | प्रकल्प ग्रस्त | पदवीधर/ पदवीका-धारक/ अंशकालीन कर्मचारी | हंगामी क्षेत्र कर्मचारी (फवारणी कर्मचारी) फक्त आरोग्य सेवक (पु.) पदासाठी | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३०% | १५% | ५% | २% | ५% | १०% | | |
| **(१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | | | | | | | | | | |
| १) | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **(२) विस्तार अधिकारी (कृषी)** | | | | | | | | | | |
| १) | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **(३) पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.यो) अंगणवाडी सेविकांमधुन निवडीने भरावयाची पदे** | | | | | | | | | | |
| १) | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २) | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| **(४) औषधनिर्माण अधिकारी** | | | | | | | | | | |
| १) | अनु.जमाती | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| २) | भज (ब) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३) | भज (क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४) | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकुण | ७ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ५ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (५) आरोग्य सेवक (पुरुष ) | | | | | | | | | | |
| १) | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २) | अनु.जमाती | १५ | ० | २ | १ | ० | १ | २ | ४ | ५ |
| ३) | विजा (अ) | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ४) | भज (क) | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ५) | भज (ड) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६) | विमाप्र | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ७) | अपंग | ४ | अंध.-२, मु. / क.-२ | | | | | | | |
| एकूण | | ३२ | ० | ३ | १ | ० | १ | २ | १० | ११ |
| (६) आरोग्य सेवक (महिला ) | | | | | | | | | | |
| १) | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २) | खुला | १२ | ० | २ | १ | ० | १ | १ | ० | ७ |
| ३) | अपंग | ४ | अंध. -२, मु. / क.-२ | | | | | | | |
| एकूण | | १७ | ० | २ | १ | ० | १ | १ | ० | ८ |
| (७) कंत्राटी ग्रामसेवक | | | | | | | | | | |
| १) | अनु.जाती | ९ | ३ | १ | ० | ० | ० | १ | ० | ४ |
| २) | अनु.जमाती | १९ | ६ | ३ | १ | ० | १ | २ | ० | ६ |
| ३) | विजा (अ) | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ४) | भज (ब) | ६ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | २ |
| ५) | भज (क) | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ६) | भज (ड) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ७) | विमाप्र | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ८) | इमाव | ११ | ३ | २ | १ | ० | १ | १ | ० | ३ |
| ९) | खुला | ५८ | १७ | ९ | ३ | १ | ३ | ६ | ० | १९ |
| १०) | अपंग | ४ | अंध. -२, मु. / क.-१, अस्थि.-१ | | | | | | | |
| एकूण | | १२३ | ३७ | १९ | ५ | १ | ५ | १३ | ० | ३९ |
| (८) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | | | | | | | | | | |
| १) | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| (९) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | | | | | | | | | | |
| १) | भज (क) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २) | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण | | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| (१०) कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | | | | | | | | | | |
| १) | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २) | अनु.जमाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३) | विजा (अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४) | भज (क) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण | | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |

| (११) परिचर (गट-ड) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जमाती | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | एकूण | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

**टिप :-** १) भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार गट क च्या पदांबाबत अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांना राहतील तर गट ड पदांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक तथा अध्यक्ष जिल्हा परिषद गट ड निवड समिती, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

२) भरतीसाठी घोषित केलेल्या वरील पदांमध्ये जाहिरातीचे दिनांकास रिक्त पदे आणि ३० एप्रिल २०१२ अखेर पर्यत नियतवयोमान सेवा निवृत्तीने रिक्त होणारी पदे यांचा समावेश आहे. त्यामुळे निवड यादीतील ज्या उमेदवारांची संभाव्य रिक्त पदांसाठी निवड होईल त्या उमेदवारांना सदर पदे जसजशी रिक्त होतील तस तसे नियुक्ती आदेश देण्यांत येतील.

३) माजी सैनिक / खेळाडु / महिला/ प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त/ पदवीधर- पदविकाधारक अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी त्या-त्या सामाजिक प्रवर्गातुन समांतर आरक्षण विरहित पात्र उमेदवारांमधुन गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

४) वरील घोषित पदांसाठी मा.विभागीय आयुक्त कार्यालयाचे अतिरिक्त संवर्ग कक्षाकडुन पात्र उमेदवार प्राप्त झाल्यास तेवढया प्रमाणात पदे कमी होऊ शकतील.

५) उमेदवार एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करणेस इच्छुक असेल तर प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे तसेच प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

६) पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.यो) या पदासाठी सध्या कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका हयाच अर्ज करण्यास पात्र राहीतील.

७) सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पुर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल होऊ शकतो.

८) अपंग पदे स्वतंत्रपणे दर्शविलेली आहेत. त्यामुळे सदर पदासाठी कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतील. मात्र दि.१९ मार्च २०१० चे शासन निर्णयानुसार निवड यादीत अपंग राखीव म्हणुन येणारा उमेदवार मागास प्रवर्गातील असेल तर त्यास मागासवर्गीय प्रवर्गात समायोजीत करणेची मुभा जिल्हा निवड समितीस राहील.

**४) शैक्षणिक अर्हता / अनुभव (अर्ज करतेवेळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.)**

**४.१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

उमेदवार स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engineering) या विषयातील मान्यताप्राप्त पदविका अथवा पदवी (तीन/चार वर्षाचा पाठयक्रम) किंवा समतुल्य अर्हता धारण करीत असावा.

**४.२) विस्तार अधिकारी (कृषि)**

उमेदवार सांविधिक विद्यापिठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण करीत असतील किंवा बी-टेक (कृषि अभियांत्रिकी) उत्तीर्ण असावेत. ज्यांनी कृषि कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारीत कृषि कामाचा ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**४.३) पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना)(अंगणवाडी सेविकामधुन निवडीने भरावयाची पदे)**

१) उमेदवार नाशिक जिल्हयातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत आदिवासी/ग्रामीण प्रकल्पातील सध्या कार्यरत अंगणवाडी सेविका ज्या बालवाडी सेविका/शिक्षिका/मदतनिस यांना अंगणवाडी सेविका म्हणून सामावून घेतले आहे अशा अंगणवाडी सेविकांच्या १० वर्षाच्या अनुभवासाठी त्यांनी बालवाडी सेविका/शिक्षिका/मदतनिस म्हणून केलेली सेवाही विचारात घेण्यात यावी. अशी एकूण मिळून १० वर्ष सलग मानधनी सेवा दिनांक १८/९/२०११ या दिनांकास पूर्ण होणारी असावी.

२) उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परिक्षा उत्तीर्ण असावी.

**४.४) औषध निर्माण अधिकारी**

उमेदवार उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासनमान्य फार्मसी पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषधे निर्माते असावेत.

**४.५) आरोग्य सेवक (पुरुष)**

१) उमेदवार विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असला पाहीजे.

२) नियुक्त व्यक्तींनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी पुरुष कर्मचारी पदासाठी महाराष्ट्र शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था,नागपूर यांचेकडून घेण्यांत येणारे अभ्यासक्रम किंवा शासनाने समकक्ष ठरविलेल्या संस्थेतील विहित १२ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण पूर्ण केले नसेल तर त्यांनी सदर प्रशिक्षण ३ संधीत यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

हिवताप हंगामी क्षेत्रिय (फवारणी) कर्मचाऱ्यांकरीता राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून ९० दिवस काम केले असल्याचे जिल्हा हिवताप अधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**४.६) आरोग्य सेवक (महिला)**

उमेदवार माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण व अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसाविका पदवीका उत्तीर्ण केलेली असावी. महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असावी किंवा अशा नोंदणीसाठी उमेदवार पात्र असावी.

**४.७ ) कंत्राटी ग्रामसेवक**

(१) नियुक्ती ही पुढील पैकी कोणत्याही एक प्रकारे करण्यात येईल.

उमेदवार उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा.

किंवा

शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याण पदवी (बी.एस.डब्ल्यु) अर्हता उमेदवार धारण करीत असावा आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**४.८) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**

उमेदवार शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणाऱ्या किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण असावी किंवा पुढीलपैकी समकक्ष पाठयक्रम (१) आर्किटेक्चरल ड्राफटमन (वास्तुशास्त्रीय आरेखक), (२) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक), (३) आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठयक्रम, (४) National Council of Training For Vocational Trades (NCTVT)/ National Apprentice Certificate (NAC) व्दारा सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर पदावरील या शाखेतील अनुभवाच्या आधारे देण्यात येणारे प्रमाणपत्र (शासनाकडुन प्राप्त स्पष्टीकरणानुसार स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/ पदवीधारक देखील सदर पदासाठी अर्ज करु शकतील.)

**४.९) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)**

१) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यांसाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकिय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) उक्त दोन भाषांपैकी कोणत्याही एका भाषेतील टंकलेखनाचे प्रमाणपत्र असल्यास दुसऱ्या भाषेतील दर मिनिटास ३० शब्दाहुन कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र उमेदवाराने नियुक्ती पासुन दोन वर्षाचे कालावधीत प्राप्त करणे अनिवार्य राहील अन्यथा नियुक्ती संपुष्टात आणली जाईल.

**४.१०) कनिष्ठ सहाय्यक (लेखा)**

१) उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परिक्षा घेण्यांसाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकिय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तसेच नियुक्तीच्या दिनांकापासुन अथवा अशा प्रकारच्या विभागीय परीक्षेचे नियम विहित करणारी तारीख यातील जी तारीख नंतरची असेल त्या तारखेपासुन दोन वर्षाच्या आत विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

**४.११) परिचर (गट ड)**

उमेदवार हा मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असला पाहिजे. (परंतु आकस्मिकता निधीतुन वेतन दिल्या जाणाऱ्या पुर्णकालीक किंवा अंशकालीक आस्थापनेवर किमान सलग तीन वर्ष एवढया कालावधी करीता काम केलेल्या व्यक्तींना अधिक पसंती दिली जाईल.)

**५) इतर अर्हता :-**

परिच्छेद ३ मधील अ.क्र.११ कडील परिचर (गट ड) चे पद वगळून गट क च्या अ.क्र. १ ते ६ व ८ ते १० पदांकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविणेबाबत) नियम १९९९ च्या ३ अन्वये अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असावे. सदरचे प्रमाणपत्र नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांचे आंत प्राप्त करणे अनिवार्य राहील अन्यथा उमेदवारास नेमणुक मिळाली तरी ती संपुष्टात आणली जाईल. अ.क्र. ७ कंत्राटी ग्रामसेवक या पदासाठी संगणक / हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालायाने वेळोवेळी विहित केलेले परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्ज करतेवेळी धारण करणे आवश्यक राहील.

**६) वयोमर्यादा :-**

उमेदवाराचे वय दिनांक **१८/९/२०११** या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे आणि खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**कमाल वयोमर्यादा पुढील प्रकरणी शिथिलक्षम असेल.**

१) शारीरिक दृष्टया अपंग उमेदवारांच्या बाबतीत वयाचे ४५ वर्षापर्यंत.
२) संरक्षण दलात ६ महिन्यांपेक्षा जास्त सलगसेवा केलेल्या माजी सैनिकांकरीता, संरक्षण दलातील सेवा अधिक ३ वर्ष तथापी अपंग माझी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यत.
३) स्वातंत्र सैनिकांच्या पाल्यांसाठी पाच वर्ष पर्यंत शिथीलक्षम.
४) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त यांच्या नामनिर्देशित उमेदवारास वयाची मर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.
५) सुशिक्षित बेरोजगारांना अर्थ सहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक उमेदवाराबाबत कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत.
६) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.
७) खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम.
८) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेबाबतीत जे उमेदवार १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्षे मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहुन वयोमर्यादा ४७ वर्ष इतकी शिथील करता येईल.
९) पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.यो.)अंगणवाडी सेविकेमधुन निवडीने भरावयाच्या पदांबाबत लेखी परिक्षेच्या दिनांकास अंगणवाडी सेविकेचे वय ५५ वर्षापर्यंत.

**७ अ) अर्ज स्विकृती कालावधी, छाननी, प्रवेशपत्रे वितरण व लेखी परिक्षेचा कार्यक्रम.**

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | शासनाने विहित केलेला लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ | अर्ज स्वीकारण्यांचा कालावधी | अपात्र अर्जाची यादी घोषीत दिनांक | प्रवेशपत्र वितरणाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन-४३००) | ९/१०/२०११ स.१० ते ११.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०४/१०/२०११ | ५/१०/२०११ ते ८/१०/२०११ |
| २ | विस्तार अधिकारी (कृषि) | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन-४२००) | ९/१०/२०११ स.१० ते ११.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०४/१०/२०११ | ५/१०/२०११ ते ८/१०/२०११ |
| ३ | पर्यवेक्षिका (एबाविसेयो) | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन-४१००/-) | ९/१०/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०४/१०/२०११ | ५/१०/२०११ ते ८/१०/२०११ |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-२८००/-) | १६/१०/२०११ स.१० ते ११.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०७/१०/२०११ | १०/१०/२०११ ते १५/१०/२०११ |
| ५ | आरोग्य सेवक (पुरुष) | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-२४००/-) | १६/१०/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०७/१०/२०११ | १०/१०/२०११ ते १५/१०/२०११ |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-२४००/-) | १६/१०/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०७/१०/२०११ | १०/१०/२०११ ते १५/१०/२०११ |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | दरमहा मानधन रु.२५००/- + नियमित ग्रामसेवकाप्रमाणे प्रवासभत्ता | २३/१०/२०११ स.१० ते ११.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | १३/१०/२०११ | १६/१०/२०११ ते २२/१०/२०११ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-२४००/-) | २३/१०/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | १३/१०/२०११ | १६/१०/२०११ ते २२/१०/२०११ |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-१९००/-) | ६/११/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | २७/१०/२०११ | ३०/१०/२०११ ते ०५/११/२०११ |
| १० | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन-१९००/-) | ६/११/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | २७/१०/२०११ | ३०/१०/२०११ ते ०५/११/२०११ |
| ११ | परिचर (गट-ड) | ४४४०-७४४० (ग्रेड वेतन-१३००/-) | १३/११/२०११ दु.२ ते ३.३० | १९/०९/२०११ ते ०१/१०/२०११ | ०३/११/२०११ | ०६/११/२०११ ते १२/११/२०११ |

**७ ब) अर्ज करावयाची पध्दत :-**

१) उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **http://www.zpnashikgov.in** तसेच **www.BrainAge.in** या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन **३० x २०** से.मि.आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत: चा फोटो स्वत:ची स्वाक्षरी करुन अर्जावर चिकटवावा. टपालाने अर्ज पाठवितांना भारतीय टपालसेवेमार्फत पाठवावा. अर्ज बंद केल्यावर लिफाफयावर स्वत:चे पुर्ण नाव **अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहुन रेखांकित करावा.**

**उमेदवाराने स्वत:चा ठळक अक्षरात पत्ता लिहीलेले व रुपये ५ चे पोष्टाचे टिकीट लावलेले ५ x ११ से.मि. आकाराचे रिकामे पाकीट अर्जासोबत जोडावे. ज्या उमेदवारांनी सदरचे पाकीट जोडले नाही त्यांना परीक्षा प्रवेशपत्र पोष्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

२) भरलेला अर्ज **पोष्ट बॅग नं.२,व्दारा सब पोष्ट मास्तर ऑफिस, शिवाजीनगर, पूणे ४११ ००५** या पत्यावर दिलेल्या अंतिम तारीख व वेळेच्या आंत पोचतील या बेताने डाकेने पाठवावेत. वर नमुद केलेल्या पत्या व्यतिरिक्त इतर कोठेही प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ०१/१०/२०११ रोजी सांयकाळी ५.४५ वाजेपर्यंत** प्राप्त झालेले अर्जच फक्त स्विकारले जातील, त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पोष्टाने झालेल्या विलंबाबद्दल हे कार्यालय जबाबदार असणार नाही व त्यासंबंधी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. आलेल्या अर्जापैकी अपात्र अर्जाची यादी वरील दिलेल्या तक्त्यामधील दिनांकास जिल्हा परिषद कार्यालयाचे सुचना फलकावर व जिल्हा परिषद नाशिक **http://www.zpnashikgov.in** तसेच **www.BrainAge.in** या संकेत स्थळावर घोषित केली जाईल. याबाबत अर्जदाराचे काही आक्षेप असल्यास ते त्यानंतरच्या दोन दिवसात सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत जिल्हा परिषदेचे संबधित खातेप्रमुखांकडे नोंदविणेचे आहेत. जिल्हा परिषदेचे संबधित खातेप्रमुख यांनी तात्काळ अशा आक्षेपांबाबत निर्णय द्यावयाचा आहे.

४) उमेदवारांने विहित नमुन्यामधील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागु होत नसेल तिथे लागु नाही असे नमुद करावे. अर्जदाराने त्याचा प्रवर्ग न चुकता नमुद करावा. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमुद केला असेल त्याच प्रवर्गाकरता अर्जदाराचा विचार करणेत येईल.

५) वर नमुद केलेले पदांपैकी कनिष्ठ अभियंता (स्था), विस्तार अधिकारी (कृ), पर्यवेक्षिका (एबाविसेयो) यांना प्रवेश पत्र पोस्टाने निर्गमित करण्याकरीता पुरेसा कालावधी नसल्यामुळे पोष्टाने प्रवेशपत्र निर्गमित केले जाणार नाही. सदर पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी **http://www.zpnashikgov.in** तसेच **www.BrainAge.in** या संकेतस्थावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करावे अथवा जिल्हा परिषद कार्यालय नाशिक येथील केंद्रावरुन प्रवेशपत्रे प्राप्त करुन घ्यावेत.

**८) अर्जासोबत सादर करावयाचे परिक्षा शुल्क**

अर्जासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे नावे काढलेला राष्ट्रीयीकृत बँकेचा नाशिक येथे देय असलेला खालील रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडावयाचा आहे. सदर परिक्षा शुल्क ना-परतावा राहील. तो कोणत्याही कारणास्तव परत केला जाणार नाही. डी.डी.चे पाठीमागील बाजुस अर्जदाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव, स्वत:चे नाव व पत्ता टाकावा. धनादेश, पोस्टल ऑर्डर, रोख रक्कम इ. स्विकारली जाणार नाही.

**(टिप :- माजी सैनिक यांनी अर्जासोबत परिक्षाशुल्क भरण्याची आवश्यकता नाही.)**

| **पदाचे नांव** | **मागासवर्गीय उमेदवारांसाठी परिक्षा शुल्क** | **इतर उमेदवारांसाठी परिक्षा शुल्क** |
|---|---|---|
| कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | रुपये **७५/-** (रुपये पंच्यात्तर मात्र) | रुपये **१५०/-** (रुपये एकशे पंन्नास मात्र) |
| इतर सर्व पदांसाठी | रुपये **१००/-** (रुपये शंभर मात्र) | रुपये **२००/-** (रुपये दोनशे मात्र) |

**९) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

उमेदवाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्यप्रतीच स्विकारल्या जातील. मुळ प्रमाणपत्रे अथवा गुणपत्रके अर्जासोबत जोडु नयेत. मात्र उमेदवाराची मुलाखतीसाठी निवड झाल्यास त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखवावी लागतील.

१) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे / गुणपत्रके.

२) जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत दिलेला जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र.

३) आरक्षित पदासाठी अर्ज केला असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र. (मात्र आरक्षित पदासाठी निवड झाल्यास जातवैधता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर केले नाहीतर नेमणुक आदेश निर्गमित केले जाणार नाहीत.)

४) वि.जा.(अ) ,भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड),वि.मा.प्र. व इमाव या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिलांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले सन २०११-१२ साठी वैध असलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबधीत आरक्षणांचा लाभ दिला जाईल, अन्यथा दिला जाणार नाही.

५) अपंग/माजीसैनिक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/पदवीधर,पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी/ हंगामी क्षेत्र (फवारणी) कर्मचारी या प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

६) खेळाडु म्हणुन लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांबाबत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रिडा स्पर्धात वैयक्तिक/सांघिक स्पर्धेत प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांकाचे किंवा सुवर्ण पदक / रौप्य पदक / कांस्य पदक यापैकी पदक / पारितोषिक मिळालेबाबत प्रमाणपत्र

७) अनुभवाचे प्रमाणपत्र.

८) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांचे बाबत कामकाजापुष्ठयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

९) परिक्षा शुल्काचे धनाकर्ष.

१०) अर्जावर एक अलिकडच्या काळातील स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो स्वतःची स्वाक्षरी करुन अर्जावर चिटकवावा

**१०) इतर महत्वाच्या सुचना.**

१) अर्जदार भारताचा नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेबद्दल अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

२) आरोग्य सेवक (महिला), पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) या पदांसाठी फक्त महिला उमेदवारच अर्ज करु शकतील.

३) शासकिय / निमशासकिय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज नियुक्तीप्राधिकारी यांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. अशी प्रत जोडली नाही तर अर्ज अपात्र घोषित करण्यांत येईल.

४) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात अथवा अन्य तत्सम शासकीय / निमशासकीय प्राधिकाऱ्याकडे रोजगारासाठी नांव नोंदणी केली असल्यास नांव नोंदणी प्रमाणपत्राची प्रामाणित सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

५) सामाजिक आरक्षणाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्राची प्रमाणित सत्य प्रत सादर करणे अनिवार्य राहील. अर्जदाराकडे जातवैधता प्रमाणपत्र असल्यास त्याची प्रमाणित सत्यप्रत जोडावी. आरक्षित पदासाठी उमेदवाराची निवड झाल्यास नियुक्ती जात वैधता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर केले नाहीतर नेमणुक आदेश निर्गमित केले जाणार नाही.

६) समांतर आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी उदा.माजी सैनिक, खेळाडू, अपंग, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पदवी-पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी त्या पुष्टयर्थ सक्षम प्राधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत सादर करणे अनिवार्य राहील.

७) अस्थिव्यंग/अंध/कर्णबधीर/मुकबधीर या स्वरुपाच्या अपंगत्वाबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय मंडळाकडील अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. किमान ४०% अपंगत्व असणे आवश्यक आहे.उमेदवाराची अपंग प्रवर्गातून निवड झाल्यास प्रादेशिक वैद्यकिय मंडळाकडून तपासणी होऊन वैध व या पदाकरीता वैद्यकिय दृष्टया पात्र ठरल्यासच नेमणूक आदेश देण्यांत येतील.

८) अपंग उमेदवारास लेखनिक आवश्यक असल्यास त्याने तसा अर्ज देणे आवश्यक आहे. लेखनिकास शैक्षणिक आर्हता ज्या पदासाठी लेखी परिक्षा आहे त्या पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असावी. तसेच उमेदवाराचे शैक्षणिक अर्हतेपेक्षा देखील कमी असावी. उमेदवार स्वतः सोबत लेखनिक आणणार असेल तर त्या लेखनिकाच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या पुराव्या दाखल अभिलेख सोबत सादर करणे आवश्यक राहील. अपंग व्यक्तीसाठी शासन पात्रतेचे निकष ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय अपंग-२००७/प्र.क्र.५२१/आस्था-९ दि.२ जुलै, २००८ नुसार विचारात घेतले जातील.

९) खेळाडू राखीव पदाकरीता अर्जदाराने राष्ट्रीय/राज्य पातळीवरील मान्यता प्राप्त क्रिडा स्पर्धेत वैयक्तीक/सांघिक स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार किंवा सुवर्ण / रौप्य / कांस्य यापैकी पदक प्राप्त केलेले असावे. तसेच

क्रिडा विषयक प्रमाणपत्राच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांबाबत मा.संचालक, क्रिडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्रिडाविषयक प्रमाणपत्र वैध ठरविल्यानंतरच उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यांत येईल. क्रिडाविषयक प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास झालेली निवड आपोआप संपूष्टात (रद्द) येईल.

१०) पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षित पदांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी च्सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्यछ या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयाचे किमान तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असावे. व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेली असावी.

११) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहीत उमेदवाराने त्यांच्या अर्जासोबत अर्जाच्या दिनांकास हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदार विवाहीत असेल तर अर्जदाराच्या हयात मुलापैकी दिनांक २८ मार्च २००६ नंतर तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा.उमेदवार अविवाहीत असेल तरी सुध्दा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२) उमेदवारांना लेखी/व्यवसायिक परिक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहाणार नाही.

१३) निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१४) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडु नये.

१५) शासन निर्णय, वित्त विभाग अनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परीभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१६) भरती प्रक्रियेच्या संबंधात काही तक्रारी मतभेद निर्माण झाल्यास न्यायालयीन अधिकार क्षेत्र नाशिक शहर न्यायालयाच्या कक्षेतच राहील.

१७) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दि.१० जुलै, २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा विभागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. तथापि त्यांनी सदर ८६५ गांवातील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील. त्यानुसार उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण आधिवासी असणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीसाठी दि.१० ऑगस्ट १९५०, विमुक्त जाती / भटक्या जमातीसाठी दि.२१ नोव्हेंबर, १९६१ इतर मागासवर्गासाठी दि.१३ ऑक्टोंबर १९६७ व विशेष मागास प्रवर्गासाठी दि.१३ जुन, १९९५ या तारखेस किंवा त्यापुर्वी पासुन उमेदवाराचे वा त्याचे वडीलांचे महाराष्ट्रामध्ये अधिवास असने आवश्यक आहे व त्याप्रमाणे अधिवासाचे पुरावे सादर करणे बंधनकारक राहील.

१८) ज्या पदाच्या लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहे अशा पदांबाबत उमेदवार कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करु शकतो. दोन्ही पदासाठी अर्ज केल्यास संबंधीत उमेदवार एका पदाच्या लेखी परीक्षेस न बसण्याबाबत वैयक्तिकरित्या जबाबदार राहील.

१९) उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होऊन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आनणे इत्यादी कार्यवाही केली जाईल.

**११) लेखी परिक्षा व मुलाखतीचे गुणांकन आणि मुलाखतीस व निवडीस पात्र होण्यासाठी किमान गुण :-**

शासन परिपत्रक क्र.एपिटी-२००७/प्र.क्र.३०३(अ)/आस्था-८ दि.१९ मार्च, २००८ सोबतचे परिशिष्ठ ब नुसार लेखी परिक्षा व मुलाखतीच्या गुणांकनाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षेचे गुण | मुलाखती गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | **१८०** | **२०** | **२००** |
| २ | विस्तार अधिकारी (कृषि) | **१८०** | **२०** | **२००** |
| ३ | पर्यवेक्षिका (एबाविसेयो) | **२००** | **२५** | **२२५** |
| ४ | औषध निर्माण अधिकारी | **१८०** | **२०** | **२००** |
| ५ | आरोग्य सेवक (पुरुष) | **१८०** | **२०** | **२००** |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | **१८०** | **२०** | **२००** |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | **१८०** | **२०** | **२००** |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | **१८०** | **२०** | **२००** |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | **२००** | **०** | **२००** |
| १० | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | **२००** | **०** | **२००** |
| ११ | परिचर (गट-ड) | **७५** | **२५** | **१००** |

**टिप :-** ज्या पदांच्या बाबतीत लेखी परिक्षा १८० गुणांची दर्शविली आहे तेथे लेखी परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका भाग एक १०० गुणांची व भाग दोन ८० गुणांची असेल. मुलाखतीस पात्र होण्यासाठी भाग एक मध्ये किमान **४५** टक्के गुण मिळविणे

आवश्यक राहील. भाग एक मध्ये किमान **४५%** गुण मिळालेल्या उमेदवारांच्या भाग एक व भाग दोन च्या एकुण गुणांच्या आधारे गुणानुक्रम काढुन त्याआधारे शासनाने विहित केलेल्या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. अंतिम निवडीसाठी एकुण गुणांच्या किमान **४५%** गुण मिळविणे आवश्यक राहील.

**१२) लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.**

१. परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

२. ज्या पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा आहे. अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्न राहतील.

३. ज्या पदांकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी सबंधीत प्रश्नांचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्न राहतील.

४. ज्या पदांसाठी व्यावसायिक ज्ञान आवश्यक असेल अशा पदांसाठी लेखी परिक्षा १८० गुणांची राहील आणि त्यापैकी ८० गुणांचे प्रश्न त्या पदाशी संबधीत तांत्रिक ज्ञानावर आधारीत राहतील.

५. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणाऱ्या उमेदवारांना नाशिक जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान इत्यादी स्थानिक बार्बीची माहिती असणे आवश्यक आहे.

६. परिचर (गट ड) पदांबाबत प्रश्न पत्रिकेचा दर्जा इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परिक्षेस समकक्ष राहील.

**१३) निवडसुची व तिची कालमर्यादा :-** निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी किंवा नवीन सुची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहीरात देण्यांत येईल, त्या दिनांकापर्यत यापैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल.

**१४) मुलाखत पात्र उमेदवारांची यादी व अंतिम निवड यादी.**

लेखी परिक्षेत मिळालेले गुण आणि आरक्षित प्रवर्ग विचारात घेऊन शासनाने विहीत केलेल्या प्रमाणात मुलाखत पात्र उमेदवारांची यादी घोषित करण्यांत येईल. मुलाखतीसह संपूर्ण निवड प्रक्रिया लेखी परिक्षेच्या दिनांकापासुन पाच दिवसांत (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून) पूर्ण होणे अपेक्षित असल्याने मुलाखतीचा दिनांक व मुलाखत पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषद नाशिक आणि जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे प्रसिध्द करण्यात येईल. तसेच ही जाहिरात प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्रातुन मुलाखतीचा दिनांक वेळ व ठिकाण याबाबतची सुचना जाहिर करणेत येईल. त्याच प्रमाणे नाशिक जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ **http://www.zpnashikgov.in** तसेच **www.BrainAge.in** वर प्रदर्शित केली जाईल. कोणाही उमेदवाराला मुलाखतीबाबत वैयक्तीक पत्राव्दारे कळविले जाणार नाही. त्यामुळे मुलाखतीचा दिनांक व मुलाखत पात्र उमेदवारांची यादी जाणून घेणे ही उमेदवारांची वैयक्तीक जबाबदारी राहील. (अपरिहार्य कारणास्तव अथवा जिल्हा निवड समितीचे नियंत्रणाबाहेरील कारणास्तव निवड प्रक्रियेस जास्त कालावधी देखील लागु शकेल.) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदांसाठी उमेदवारांची निवड करतांना मुलाखती न घेता फक्त लेखा परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे आणि पदांचे सामाजिक समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड यादी तयार करणेत येईल. उर्वरित पदांबाबत लेखी परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखतीतील मिळालेले सरासरी गुण यांची बेरीज आणि पदांची सामाजिक समांतर आरक्षण विचारात घेऊन अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

एखादा उमेदवार लेखी परिक्षेत अधिक गुण मिळवुन देखील मुलाखतीला गैरहजर राहील्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस करता येणार नाही मात्र एखादया उमेदवाराला मुलाखतीला उपस्थित राहीलेनंतर मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा उमेदवाराची शिफारस करण्यात येईल. निवड प्रक्रियेसंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. निवड यादीतील उमेदवारांना नंतर शासनाच्या पुढील आदेशानुसार नियुक्त्या देण्यात येतील.

**१६) खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील.**

१) विहित नमुन्यातील नसलेले अर्ज.

२) फोटो सांक्षांकीत नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

३) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.

४) विहित पात्रता पुर्ण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.

५) मजकुर अपुर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.

६) आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज.

७) विहित केलेप्रमाणे परिक्षा शुल्क न भरलेली व जोडलेली अर्ज.

८) शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांचे बाबतीत अर्जासोबत नियुक्ती प्राधिकारी यांचे परवानगीची प्रत न जोडलेले अर्ज.

९) कंत्राटी ग्रामसेवकांचे बाबतीत विहित संगणक अर्हता नसलेले अर्ज

**(रणजीत कुमार)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक तथा**
**सदस्य जिल्हा निवड समिती, नाशिक**
**तथा अध्यक्ष जिल्हा परिषद गट-ड निवड समिती**

**(पी. वेलरासु)**
**जिल्हाधिकारी नाशिक तथा**
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती**
**नाशिक**